**ठळक बातम्या**

- संसदेचं पावसाळी अधिवेशन सोमवारपासून, उद्या सर्वपक्षीय बैठक
- भारत आणि युरोपियन मुक्त व्यापार संघटनेबरोबरचा व्यापार आणि आर्थिक भागिदारी करार १ ऑक्टोबरपासून लागू होणार
- पहलगाम हल्ल्याचा चीननं केला निषेध, दहशतवादाविरोधातली एकजूट बळकट करायचं केलं आवाहन
- आंतरराष्ट्रीय गणित ऑलिंपियाडमध्ये भारतीय संघाची तीन सुवर्णपदकांसह सहा पदकांची कमाई

**आणि**

- इंग्लंड विरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतल्या दुसऱ्या संघात भारतीय महिला संघाची खराब सुरुवात, पावसामुळं केवळ २९ षटकांचा सामना

<><><><><>

संसदेचं पावसाळी अधिवेशन सोमवारपासून सुरू होणार असून या पार्श्वभूमीवर सरकारनं उद्या सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळीतपणे चालावं यासाठी सर्व पक्षांनी सहकार्य करावं असं आवाहन सरकार या बैठकीत करेल. २१ ऑगस्टपर्यंत चालणाऱ्या या अधिवेशनादरम्यान दोन्ही सभागृहांच्या एकंदर २१ बैठका होतील. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं की संसदेत उपस्थित होणाऱ्या सर्व महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करायची सरकारची तयारी आहे. जन विश्वास दुरुस्ती विधेयक २०२५, राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक २०२५ यासह इतर अनेक महत्त्वाची विधेयकं या अधिवेशनात चर्चेसाठी येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

<><><><><>

राष्ट्रपती आणि राज्यपालांनी त्यांच्याकडे आलेल्या विधेयकांना ठराविक कालमर्यादेत मंजुरी देण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयानं काही महिन्यांपूर्वी निकाल दिला होता. यामुद्द्यावर राष्ट्रपतींनी विचारार्थ दाखल केलेल्या प्रस्तावावर सर्वोच्च न्यायालयात २२ जुलै रोजी सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्यासह एकंदर ५ न्यायाधीशांच्या घटनापीठासमोर ही सुनावणी होईल. तामिळनाडूमध्ये विधीमंडळानं मंजूर केलेली विधेयकं राज्यपालांनी रोखून धरल्याप्रकरणी राज्य सरकारनं सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. याप्रकरणी ठराविक कालमर्यादेत निर्णय घेण्याचा सल्ला सर्वोच्च न्यायालयानं दिला होता.

<><><><><>

भारत आणि युरोपियन मुक्त व्यापार संघटनेबरोबरचा व्यापार आणि आर्थिक भागिदारी करार १ ऑक्टोबरपासून लागू होणार आहे, अशी घोषणा केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी आज केली. यामुळं देशात १० लाखांहून अधिक रोजगारांची निर्मिती होईल, असं ते म्हणाले. युरोपियन मुक्त व्यापार संघटनेत आइसलँड, लिंचेस्टाइन, नॉर्वे आणि स्वित्झर्लंड यांचा समावेश होतो. गेल्या वर्षी १० मार्च रोजी या करारावर स्वाक्षरी झाली होती. यानुसार पहिल्या १० वर्षांत हे देश ५० अब्ज डॉलरची आणि पुढच्या ५ वर्षांत आणखी ५० अब्ज डॉलरची गुंतवणूक करणार आहेत.

<><><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज उत्तराखंडमध्ये रुद्रपूर इथं उत्तराखंड सरकारच्या १ हजार २७१ कोटी रुपये किंमतीच्या विविध विकास कामांचं उद्घाटन आणि पायाभरणी केली. रुद्रपूर इथं आयोजित ‘उत्तराखंड गुंतवणूक महोत्सव २०२५’ मध्ये त्यांनी देशभरातले गुंतवणूकदार आणि उद्योजकांशी संवाद साधला. उत्तराखंडसारख्या छोट्या राज्यांच्या प्रगतीशिवाय देशाचा विकास होऊ शकत

नाही, म्हणूनच केंद्र सरकार लहान राज्यं आणि पूर्वेकडच्या राज्यांच्या विकासाकडे विशेष लक्ष देत आहे, असं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी तंत्रज्ञानाचा पाया भक्कम करायचं काम वेगाने सुरू आहे, असं प्रतिपादन माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज केलं. हैदराबादच्या भारतीय तंत्रज्ञान संस्थेच्या पदवीदान सोहळ्यात ते बोलत होते. देशाच्या तंत्रज्ञानाधारित भविष्याकडे लक्ष वेधून त्यांनी विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचं तंत्रज्ञान आणि उत्पादनं तयार करण्याचं आवाहन केलं. पहिली सेमीकंडक्टर चिप याच वर्षी तयार होईल, अशी घोषणा वैष्णव यांनी यावेळी केली.

यानंतर वैष्णव यांनी केंद्रीय कोळसा खाण मंत्री जी. किशन रेड्डी यांच्यासह काझीपेट इथल्या रेल्वे उत्पादन केंद्राची पाहणी केली. या केंद्रातून रेल्वेची इंजिनं, डबे इत्यादीचं उत्पादन पुढच्या वर्षीपासून पूर्ण होऊन पुढच्या वर्षीपासून सुरू होईल, असं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

२०४७ सालापर्यंत विकसित देश होण्याचं भारताचं ध्येय असून, त्यासाठी प्रत्येक नागरिकाची भूमिका महत्त्वाची आहे, असं प्रतिपादन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज केलं. केरळमध्ये आयआयटी पलक्कडच्या ७व्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते. विद्यार्थ्यांनी वाहतूक, गृहनिर्माण, वैद्यकीय सुविधा आणि शेतीसह विविध क्षेत्रांमध्ये जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांच्या उभारणीत पुढाकार घ्यावा, असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

बेटिंग ॲपच्या विविध प्रकरणांमधे गुगल आणि मेटा कंपन्यांना सक्तवसुली संचालनालयाने नोटीस जारी केली आहे. या कंपन्यांच्या प्रतिनिधींनी येत्या

सोमवारी ईडीच्या दिल्ली कार्यालयात चौकशीसाठी हजर रहावं असं या नोटीशीत सांगितलं आहे. बेटींग ॲपच्या प्रसारात या दोन डिजिटल मंचांची भूमिका काय? याचा तपास संचालनालय करीत आहे.

**<><><><><>**

चीननं पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला असून प्रादेशिक सुरक्षा मजबूत करण्याच्या हेतूनं सर्व देशांनी दहशतवादाविरोधातली एकजूट बळकट करण्याचं आवाहन केलं आहे. पहलगाम हल्ल्यामागे हात असलेल्या रेझिस्टन्स फ्रंट या लष्कर-ए-तैय्यबाच्या सहयोगी संघटनेला अमेरिकेनं दहशतवादी संघटना म्हणून घोषित केल्याच्या पार्श्वभूमीवर चीननं ही प्रतिक्रिया दिली.

**<><><><><>**

६६ व्या आंतरराष्ट्रीय गणित ऑलिंपियाडमध्ये भारताच्या संघानं सहा पदकांची कमाई केली. यात तीन सुवर्ण, २ रौप्य आणि एका कांस्यपदकाचा समावेश आहे. महाराष्ट्राचा आदित्य मांगुडी, तसंच दिल्लीचे कणव तलवार आणि आरव गुप्ता यांनी सुवर्णपदकावर नाव कोरलं. कर्नाटकचा अबेल जॉर्ज मॅथ्यू आणि दिल्लीचा आदिश जैन यांनी रौप्यपदक मिळवलं, तर दिल्लीच्या अर्चित मानसला कांस्य पदक मिळालं. ऑस्ट्रेलियात सनशाइन कोस्ट इथं झालेल्या या स्पर्धेत एकंदर ६३० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे इंग्लंड विरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात भारताची सुरुवात खराब झाली. सलामीवीर प्रतीका रावल अवघ्या तीन धावात बाद झाली. इंग्लंडनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. दुपारी साडे ३ वाजता सुरू होणं अपेक्षित असलेला हा सामना पावसामुळं संध्याकाळी साडे ७ वाजता सुरू झाला. यामुळं हा सामना ५०

ऐवजी केवळ २९ षटकं खेळला जाईल. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ९ षटकात १ गडी बाद ४६ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

इस्त्राएल आणि सीरियामध्ये युद्धबंदीवर सहमती झाल्याचं तुर्किएमधले अमेरिकेचे राजदूत टॉम बॅरॅक यांनी आज सांगितलं. इस्त्राएलनं सीरियावर केलेल्या हवाई हल्ल्यानंतर युद्धबंदी घोषित झाली. दरम्यान, आपले हल्ले ड्रुझ या अरब धार्मिक अल्पसंख्याक समुदायाचं रक्षण करण्यासाठी होते असा दावा इस्त्राएलनं केला आहे. सीरियाचे दीर्घकाळ शासक राहिलेले बशर अल-असद यांच्या पतनानंतर सरकार समर्थक सैन्य आणि ड्रुझ समुदाय, यांच्यात संघर्ष सुरु झाला होता. यामध्ये आतापर्यंत ३०० पेक्षा जास्त  लोक मारले गेले आहेत, तर या प्रदेशातले हजारो नागरिक विस्थापित झाले आहेत.

**<><><><><>**

भारताच्या बॅडमिंटनपटूंनी आशियाई कनिष्ठ मिश्र सांघिक अजिंक्यपद स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. इंडोनेशियात सुरू असलेल्या या स्पर्धेच्या ड गटाच्या सामन्यात भारतानं संयुक्त अरब अमिरातीच्या संघावर ११० विरुद्ध ८३ अशा मोठ्या फरकानं मात केली. आता भारताचा पुढचा सामना उद्या हाँगकाँग चीनविरुद्ध होणार आहे.

**<><><><><>**

पाकिस्तानच्या पंजाब प्रांतात वादळी पावसामुळे जून महिन्यापासून १२० पेक्षा जास्त जणांचा मृत्यू झाला तर ४६० हून जास्त लोक जखमी झाले. गेल्या दोन दिवसांत पावसामुळे झालेल्या दुर्घटनांमधे १० जणांचा बळी गेला. प्रसारमाध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, आपत्तीग्रस्त भागात सरकारचा कोणीही प्रतिनिधी पोहोचलेला नाही, तसंच आपत्तीग्रस्तांना कोणतीही मदत मिळालेली नाही. निवारा

शिबिरांमधे कोणत्याही सुविधा नाहीत, त्यामुळे आपत्तीग्रस्तांनी तिथे आसरा घेतलेला नाही.

<><><><><>

सिक्कीममधल्या नथुला पास मार्गाने कैलास मानसरोवर यात्रेकरूंची सहावी तुकडी आज रवाना झाली. या मार्गाने आणखी चार तुकड्या या यात्रेसाठी जाणार आहेत. या सर्व तुकड्यांसोबत डॉक्टर, खानसामे आणि संपर्क अधिकारीही असतील. या यात्रेकरूंना सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विविध सरकारी आणि सुरक्षा यंत्रणा अथक परिश्रम घेत आहेत.

<><><><><>

भारतीय हवामान विभागानं केरळला आज आणि उद्या अतिमुसळधार पावसाचा रेड अलर्ट दिला आहे. येत्या ६ ते ७ दिवसांत केरळ, कर्नाटक आणि तमिळनाडूत जोरदार ते मुसळधार पाऊस कायम राहण्याचा अंदाज आहे. ओडिशा, छत्तीसगड, उपहिमालयीन पश्चिम बंगाल, आसाम, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीममध्येही येते ३ ते ४ दिवस जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्येही २४ जुलैपर्यंत, तर कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात पुढचे सहा दिवस अशीच परिस्थिती राहील.

//<><><><><>//